# महाराष्ट्र विधानपरिषद
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २४ मार्च, २०२२
### (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**(मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ व बुधवार दिनांक २३ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, चंदुभाई पटेल, प्रविण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

"राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल, विदर्भ, मराठवाडा, कोकणात व खानदेशासाठी स्वतंत्र उद्योग धोरण जाहीर करण्यात येईल, अशी निवडणूकपूर्व घोषणा करुनही उद्योग उभारण्यात सरकारला आलेले अपयश, नागपूर कराराचे पालन करण्याबाबत शासनाने दाखविलेली उदासिनता, मागील सरकारने सुरु केलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड, वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प, कोकणातील १६७ टीएमसी पाणी मराठवाडा व खानदेशाकडे वळवण्याचा प्रकल्प, अशासारख्या प्रकल्पांची थांबलेली अंमलबजावणी, शासकीय योजनात मागास भागाला मिळणारा अल्प निधी, सिंचन, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, सहकारी संस्था अशा क्षेत्रात या चारही क्षेत्रावर निधी वितरणात होणारा अन्याय, मागास भागाचा अनुशेष दूर करण्यास वैधानिक विकास मंडळाचा वाटा मोठा असताना दिनांक ३० एप्रिल, २०२० नंतर मुदत संपल्यानंतर सुध्दा सरकारने वैधानिक विकास मंडळांना मुदत वाढ दिलेली नसणे, परिणामी या भागांचा खुंटलेला विकास व शिल्लक अनुशेषात वाढ झालेली असणे, सरकारने तातडीने वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याची आवश्यकता, सिंचन, पर्यटन, उद्योग, रस्ते, प्रक्रिया उद्योग याबाबतीत सर्वच विभागांचा अनुशेष मोठया प्रमाणावर असणे, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाकडूनही कोकणावर अन्याय झाला असणे, त्यामुळे कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबत तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, तसेच, कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी रुपये २५,०००/- व बागायतीसाठी हेक्टरी रुपये ५०,०००/-ची मदत देण्याची निवडणुकीपूर्वी केलेली घोषणा, सरकारने सन २०२० व २०२१ मध्ये

अग्रिम प्रत

आलेल्या चक्रीवादळ, अतिवृष्टी, पूर, गारपीट, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत करुन पूर्णपणे भ्रमनिरास केलेला असणे, महात्मा फुले कर्जमाफी योजनेत अनेक पात्र शेतकरी अद्याप वंचित असणे, प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तसेच एकवेळ समझोता योजनेची २ वर्षपुर्ती घोषणेची सरकारने अद्याप अंमलबजावणी केलेली नसणे, शेतकऱ्यांना दिलेल्या वचनाची पुर्तता न करता, भ्रष्ट जिल्हा सहकारी बँकांच्या व्यवस्थापनांना शासनाकडून संरक्षण मिळणे, अन्य राज्यांनी शेतकऱ्यांना पॅकेजेस दिलेले असताना महाराष्ट्रात सरकारने कोणतेही पॅकेज दिलेले नसणे, शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत नसणे, चक्रीवादळ व अतिवृष्टीग्रस्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या दोन्ही वर्षाच्या पॅकेजचा लाभ बहुतांश शेतकऱ्यांना झालेला नसणे, निवडणूकपूर्व जाहीरनाम्यामध्ये शेतकरीहिताच्या अनेक योजना जाहीर करणे, परंतु गत २ वर्षात कोणत्याही घोषणेची अंमलबजावणी झालेली नसणे, शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे, अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निर्माण होणे, तसेच द्राक्ष, डाळींब व कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला असणे, ऐन हंगामात कृषि पंपाच्या वीज जोडण्या तोडण्यात आल्या असणे, शेती पंपांसाठी पैसे भरुन लाखो शेतकऱ्यांना विद्युत जोडणी मिळालेली नसणे, कृषि क्षेत्रासाठी सुरु असलेल्या योजनांची ठप्प झालेली वा संथ गतीने सुरु असलेली अंमलबजावणी, परिणामी कृषी क्षेत्राची पूर्ण वाताहत झाली असणे, परिणामी शेतकरी बांधवामध्ये नैराश्य येऊन हजारो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, परिणामी संपुर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण तसेच विदर्भ, मराठवाडा, कोकण व खानदेशातील जनतेमध्ये भेदभावपूर्ण वागणुक दिल्यामुळे पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपयायोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२-०० वाजता)

एक : **प्रश्नोत्तरे** —

(क) गुरुवार, दिनांक १० मार्च, २०२२ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला **श्री.प्रविण दरेकर व इतर वि.प.स.** यांचा "**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाकरिता ओबीसी इम्पिरिकल डाटा जमा करण्याबाबत**" या विषयावरील **तारांकित प्रश्न क्रमांक १२७३३**

(ख) **तारांकित प्रश्न.**

(ग) **गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

असुधारित प्रत

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करणे."**

**चार : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कन्नड शहरातील मकरणपूर परिसरात (जि.औरंगाबाद) कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय अनेक वर्षापासून चालविले जात असून तेथे इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे वर्ग भरविण्यात येत असणे, काही दिवसांपासून विद्यालयातील मुलींची छेड काढून मुलींशी गैरवर्तन करण्यात येत असल्याच्या तक्रारी सदर विद्यालयातील मुलींद्वारे विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचेकडे करण्यात येणे, सदर तक्रारीसंदर्भात मुलींशी छेडछाड करणाऱ्या तरुणाला विद्यालयाचे मुख्याध्यापकांद्वारे जाब विचारण्यात येऊन त्याची समजूत काढण्याचे प्रयत्न करण्यात येणे, तथापि त्याचा राग मनात धरुन दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी सदर तरुणाने तलवारी व धारदार शस्त्रानिशी मुख्याध्यापक, वसतिगृह अधिक्षक व अन्य इसमांवर प्राणघातक हल्ला केल्याची दुर्दैवी घटना घडणे, या प्राणघातक हल्ल्यात विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक गंभीर जखमी होणे, त्यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात येणे, मुख्याध्यापक, वसतिगृह अधिक्षक व शिपाई यांचेवर हल्ला करणाऱ्या गुन्हेगार तरुणाला पोलिसांना पकडण्यात आलेले अपयश, परिणामी शहरातील जनता व त्या परिसरातील विद्यार्थी व पालक यांचेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना व आलेले नैराश्य, त्यामुळे हल्लेखोर तरुणांना तातडीने पकडून त्यांचेवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी व त्याप्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता तसेच शाळा सुरक्षा कायदा करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.विनायक मेटे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई मधील वर्सोवा भागातील आरामनगर नावाची म्हाडाची वसाहत असणे, सदरील वसाहत अनेक वर्षांपासूनची असल्यामुळे तिचे पुर्नविकास

करणे आवश्यक झालेले असणे, त्या अनुषंगाने आरामनगरच्या स्थानिक असोसिएशनने RNA Construction या विकासाबरोबर सन २००७-२००८ मध्ये करारनामा करणे, त्यानंतर विकासक, स्थानिक असोसिएशन व म्हाडा असा त्रिपक्षीय करार होणे, करार होऊनही आजतागायत १५ वर्षानंतरही आरामनगर वसाहतीच्या पुर्नविकासाबाबत कोणतीही हालचाल विकासकाकडून होत नसणे, यामुळे स्थानिक रहिवाश्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, यामुळे काही स्थानिक रहिवाश्यांकडून वेगळया विकासकाबरोबर बोलणी सुरू करण्यात येणे, यामध्ये सर्व स्थानिक रहिवाश्यांना विश्वासात न घेणे, नविन विकासकाबरोबर स्थानिक रहिवाश्यांनी करारनामा करावा म्हणून दडपशाही करणे, स्थानिक प्रशासनाचा वापर करून घेणे, यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, स्थानिक रहिवाश्यांना आपल्या हक्काचे घर मिळावे यासाठी लवकरात लवकर सदरील वसाहतीचा पुर्नविकास व्हावा, याकरीता म्हाडाने पुढाकार घ्यावा व मुंबईमध्ये काही ठिकाणी अनेक वसाहतींचे म्हाडांनी पुर्नविकास करण्याच्या घेतलेल्या निर्णयासारखाच निर्णय म्हाडाने आरामनगर वसाहतीबाबत घेण्याची आवश्यकता, त्याकरिता काही लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, याबाबत स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.कपिल पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नगरविकास विभागाने मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टयांतील शाळांच्या विकासासाठी दिनांक २८ जून, २०१३ रोजी Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Modification to Regulation No.33 (10) of Development control Regulation for Gr. Mumbai under section 37(2) of the Act या अधिसूचनेद्वारे आवश्यक सुधारणा झाली असणे, या सुधारणांन्वये प्रत्यक्ष ताब्यातील जागा यापेक्षा शाळांच्या वर्गखोल्यांसाठी आवश्यक असलेली प्रतिखोली ४१० चौ. फूट जागा प्रति मंजूर वर्गतुकडयांनुसार वाढीव FSI उपलब्ध झाल्याने SRA अंतर्गत या शाळांचा मुंबईच्या मूळ DC रूलनुसार विकास शक्य होणे, तथापि, नव्या DP रूलमध्ये या सुधारणांचा उल्लेख नसल्याचे कारण सांगून SRA प्राधिकरणाने पुर्नविकासामध्ये वाढीव FSI ला नकार देणे, या संदर्भात दिनांक २८ जून, २०१३ ची अधिसूचना अंमलात येण्याची आवश्यकता असणे, मुंबई महानगरपालिकेतील माध्यमिक शाळेत सेवानिवृत्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन

मिळत नसणे, सदर शिक्षकांची पी.एफची रक्कम महानगरपालिकेकडे ठेवण्यात येणे, शासनाच्या नियमाप्रमाणे पेन्शनची रक्कम ज्या संस्थेकडे पी.एफची रक्कम ठेवण्यात येते, त्या संस्थेला पेन्शनची रक्कम देणे बंधनकारक असणे, राज्य शासनाच्या हिश्याचा विचार न करता मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १०४ खाजगी विनाअनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन देण्याची आवश्यकता असणे, गरीब व गरजू विद्यार्थी यांचा विचार करुन रात्रशाळा आणि खाजगी दिवस शाळा कार्यरत राहण्यासाठी महानगरपालिकेच्या शालेय इमारतीत भाडेतत्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांसाठी सन २०२०-२०२१ चे कोरोना कालावधीमधील अग्रीम स्वरूपात आकारलेले वार्षिक भाडे संपूर्ण माफ करण्याची आवश्यकता असणे, सदर वर्गखोल्यांकरीता दरवर्षी होणारी १० टक्के वार्षिक भाडेवाढ आकारणी रद्द करण्याची मागणी होत असणे, केवळ नाममात्र दरात रात्रशाळांना वर्गखोल्या उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

(४) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्रातील मौजा पुनापूर, मौजा पारडी, मौजा भांडेवाडी येथे महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियमानुसार स्मार्ट सिटी प्रकल्प योजिला असणे,राज्यामध्ये समृध्दी महामार्ग, नागपूर शहरातील मेट्रो रेल्वे प्रकल्प, पुणे येथील मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि इतर अन्य राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रकल्पग्रस्त प्लॉट, जमीन अथवा शेती धारकांना रेडीरेकनरप्रमाणे चारपट मोबदला देण्यात आलेला असणे, परंतु स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्ताला कुठलाही मोबदला न मिळता त्याची ४० टक्के जमीन, शेती अथवा प्लॉट या प्रकल्पांतर्गत हस्तगत केल्या जात असून शिल्लक ६० टक्के जागेला नियमानुकूल करण्यासाठी प्रती चौरस फूटाप्रमाणे रक्कम भरावी लागत असणे, ही बाब अन्यायकारक असल्याने बाधीत प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना याबाबत राज्य शासनाने पुर्नविचार करुन राज्यातील आणि देशातील इतर योजनांप्रमाणे प्लॉट, शेती, जमीनधारकाला मोबदला देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

(५) **डॉ.परिणय फुके,** श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री सुरेश धस, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अलिकडेच राज्यात सर्वत्र अवकाळी पावसासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, हजारो हेक्टर क्षेत्रावरील गहू, हरभरा, कांदा, तूर, संत्रा, केळी, आंबा या पिकांचे तसेच भाजीपाला पिकांचे सुध्दा राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असणे, याशिवाय या नैसर्गिक आपत्तीत जिवीतहानी होऊन जनावरांचाही मृत्यू झाला असणे, अचानक आलेल्या अवकाळी पावसाने विदर्भ, मराठवाडा यासह राज्यात सर्वत्र रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झालेले असणे, यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन, कापूस व तूर या पिकांनी आधीच दगा दिल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होऊन त्यांचा उत्पादनखर्चही निघू शकला नसणे, तर आता अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे रब्बी हंगामही नैसर्गिक संकटाच्या सावटाखाली आल्याने हंगामाच्या आरंभीच शेतकऱ्यांना फटका बसणे, राज्यात सर्वत्र ढगाळ व थंडीचे वातावरण कायम असल्याने रब्बीतील हरभरा व गहू सारखी प्रमुख पिकेही धोक्यात आलेली असणे, राज्यात अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे झालेले नुकसान याचे पंचनामे पूर्ण झालेले नसणे, शासनाने मदतीची घोषणा करून देखील शेतकऱ्यांकडे आर्थिक मदत पोहचलेली नसणे, करोनाची टाळेबंदी व विविध प्रकारच्या निर्बंधांमुळे उपलब्ध आहे तोही शेतीमाल बाजारपेठेत नेता येत नसल्याने शेतातच सडून जाण्याची, रस्त्यावर फेकून देण्याची वेळ अनेक शेतकऱ्यांवर आलेली असणे, नैसर्गिक आपत्तीची भरपाई नाही आणि बाजारपेठही उपलब्ध नाही, असा दुहेरी फटका शेतकऱ्यांना बसलेला असणे, शासनाने वाढीव दराने नुकसानभरपाई देण्याचे केवळ आश्वासन दिलेले असणे, वाढीव दराने नुकसान भरपाई अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, राज्यातील या आपदग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

(६) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील हंगामी रोजंदार मजुरांना कार्यमुक्त करण्याचा निर्णय शासनाद्वारे घेण्यात येणे, सन २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या यादीमध्ये १ हजार ३७१ मजुर कार्यरत असणे, मात्र त्यापैकी ४५० ते ५०० मजुरच कामावर कार्यरत असून, यामध्ये

निम्मे मजूर प्रकल्पग्रस्त असणे, अर्थात त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या सुपिक जमीनी प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या असणे, सद्यस्थितीत डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील ६५० ते ७०० पदे रिक्त असणे, तरी सदर रोजंदार मजूरांना कायम करुन त्यांना काम दिल्यानंतरही पदे रिक्त राहत असणे, तरी शासनाच्या रोजंदार मजूरांना कार्यमुक्त करण्याच्या धोरणामुळे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील गेल्या २५ वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या हजारो मजुरांच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न उभा राहिलेला असणे, यासाठी महसूलात तूट, आस्थापनेवरील वाढता खर्च, राज्याच्या विकासकामावर याचा होत असलेला परिणाम तसेच कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याचे कारण दिलेले असणे, मात्र या रोजंदार मजुरांना पोटापाण्यासाठी कोणताही पर्याय नसल्याने शासनाचा धोरणांवर सर्वच स्तरांवर संतप्त प्रतिक्रिया व असंतोषाचे वातावरण उमटत असून शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात रोजंदार मजूरांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक सकारात्मक फेरविचार करुन मजूरांना न्याय देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, चंदूभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून राज्याच्या किनारपट्टीवर ७ सागरी जिल्हे असणे, सागरी किनाऱ्यांवरील भागात ट्रॉलिंग, पर्ससीन, बॅगनेट, गिलनेट, हुकलाइन अशा विविध पद्धतीने मासेमारी करण्यात येत असणे, कोकणात सागरी मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असल्याने साधारणपणे चार लाख मच्छीमार कुटूंबे या व्यवसायावर अवलंबून असणे, मत्स्य व्यवसाय हा कृषीपूरक व्यवसाय असल्याचे यापूर्वीच सरकारने मान्य केलेले असणे, तसेच या व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असून परकीय चलनही प्राप्त होत असणे, मत्स्यव्यवसायाकरिता मच्छिमारांना नौका बांधणीसाठी मोठ्याप्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागत असून नियमितपणे जाळी, नौका दुरुस्ती, नौकेवरील साहित्य, सामुग्री दुरुस्ती, खलाशी, कर्मचारी यांचे वेतन, डिझेल, बर्फ, रेशन यावर आवर्ती खर्च करावा लागत असणे, मच्छीमारांची उत्पन्नाची क्षमता लक्षात घेता त्यांना कर्जाऊ रक्कम उभारण्याशिवाय पर्याय नसणे,

अप्रकाशित प्रत

मच्छीमारांना अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत असून गेल्या दोन-तीन वर्षात ‘क्यार’, ‘महा’, ‘निसर्ग’, ‘तौक्ते’ अशा चक्रीवादळांमुळे व दरवर्षी २ महिने व्यवसायबंदीमुळे मच्छिमारांचे उत्पन्न बुडून बोटी, नौका नादुरुस्त किंवा पूर्णपणे नष्ट झाल्या असणे, राज्य शासनाने आपत्तीग्रस्तांना मदत जाहीर केली असली तरी ती अतिशय तुटपुंजी असल्यामुळे पुन्हा व्यवसाय उभा करणे त्यांना शक्य होणारे नसणे, राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने पीक कर्ज दिले जात असले तरी मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीला अधिकृत दर्जा मिळाला नसल्यामुळे त्यांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज मिळत नसणे, त्यामुळेच मच्छीमारांकडून मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीचा दर्जा द्यावा, अशाप्रकारची मागणी सातत्याने शासनाकडे केली जात असणे, या संदर्भातील प्रस्ताव मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडून राज्य शासनाला सादरही झाला असणे, तसेच, मासेमारीला मत्स्यशेतीचा दर्जा द्यावा, अशी मागणी विधानपरिषद विरोधी पक्षनेते यांनी शासनाला त्यांच्या दिनांक ६ जुलै, २०२१ च्या पत्रान्वये केली असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील मच्छिमारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर,** प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दर्जेदार कौशल्य प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बार्टी या संस्थेकडून कौशल्य प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यात येणे, सदर कौशल्य प्रशिक्षण केंद्र हे सामाजिक संस्थांमार्फत चालविण्यात येत असणे, या सामाजिक संस्थामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत असून सदर योजना मागील अनेक वर्षांपासून मुंबईसह राज्यभरात कार्यान्वित असणे, या कौशल्य प्रशिक्षण केंद्रांतून अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षण घेतले असल्याची बाब समोर येणे, परंतु या विद्यार्थ्यांना मिळणारे अनुदान हे मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने सदर सामाजिक संस्थांना अडचणी निर्माण झाल्याचे निदर्शनास येणे, यामुळे सदर कौशल्य प्रशिक्षण केंद्र बंद पडण्याची शक्यता निर्माण होणे, परिणामी मागासवर्गीय विद्यार्थी हक्काच्या कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित राहत असणे, शासनाच्या या धोरणामुळे संस्थाचालक व मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष,

अग्रिम प्रत

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नियमितपणे कौशल्य प्रशिक्षण मिळण्यासाठी सदर संस्थांचे प्रलंबित अनुदान तातडीने मंजुर करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(९) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"भोकरदन (जि.जालना) शहरातून वाहणाऱ्या केळणा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, नदीपात्रात साचलेल्या पाण्यावर हिरवे शेवाळ तयार झाले असून पात्रात सर्वत्र अस्वच्छता पसरल्याने नदीला गटाराचे आलेले स्वरुप, परिणामी नदीचे अस्तित्व धोक्यात येणे, शहरातील सांडपाणी नदीपात्रात सोडले जात असणे, तसेच कचरा, जागोजागी साचलेल्या घाण पाण्यात डुकरे, मोकाट जनावरे बसत असल्याने आजूबाजूच्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, परिसरात रोगराई पसरण्याची निर्माण झालेली भिती, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून नदी स्वच्छता अभियान राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सात : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

(१) **सर्वश्री शशिकांत शिंदे,** अमोल मिटकरी, संजय दौंड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"केंद्र शासनाने संपूर्ण भारतभर कृषि धोरण राबविण्याच्या निमित्ताने ३ कृषि कायदे पारित केले असून या कृषि कायद्यांना देशातील अनेक शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला होता. तर काही राज्यांनी हा कायदा लागू केलेला नसणे, सदरील कृषि कायदे रद्द करण्याचा निर्णय केंद्र शासनाकडून घेण्यात येणे, परंतु अद्यापि महाराष्ट्र राज्यामध्ये सदरील कृषि कायदे रद्द केल्याबाबत कोणतीही अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, या रद्द केलेल्या कृषि कायद्याचा अधिकार पणन विभाग किंवा राज्यातील बाजार समितीकडे देखील देण्यात आलेला नसणे, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती आवारामध्ये अन्नधान्य, मसाला, भाजीपाला, फळे व कांदा बटाटा अशी मार्केट असणे, केंद्र शासनाचा कृषि कायद्याची अंमलबजावणी करण्याचे

अस्थायी प्रत

निमित्ताने महाराष्ट्र राज्याच्या पणन खात्याने वेळोवेळी अनेक कायदे, नियम व निर्णय घेतलेले असणे, सदरील केंद्राचा हा कृषि कायदा रद्द झाल्याने राज्याच्या पणन विभागाने वेळोवेळी या कायद्याच्या अनुषंगाने घेतलेला निर्णय रद्द करणे गरजेचे असणे, त्याअनुषंगाने आजमितीपर्यंत मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या पाचही मार्केटमध्ये अनेक वस्तुवर बाजार समितीच्या नियमानातून सुट दिलेली असणे, त्यामुळे बाजार समितीच्या आवारातील व्यापारी, कामगार व इतर सर्व घटकांवर त्याचा फार विपरीत परिणाम झालेला असणे, सुकामेवा, साखर, डाळी, खादयतेल हे सन २०१३ पासून नियमन मुक्त करण्यात आले असणे, या वस्तु थेट शेतकऱ्यांकडून येत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा काही संबंध येत नसणे, त्यामुळे बाजार समितीला त्याचा सेस मिळत नसल्यामुळे याचा बाजार समितीच्या व्यवसायावर परिणाम होत असणे, परिणामी माथाडी कामगारांच्या मजुरीवर त्याचा परिणाम होत असणे, केंद्र शासनाकडून पारित केलेला कृषि कायदा रद्द केल्यानंतर तो आपल्या राज्य शासनाकडून रद्द करुन राज्यातील बाजार समितीमधील कामगार, व्यापारी व इतर घटकांना न्याय देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री विनायक मेटे,** निलय नाईक, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाचे तसेच ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण रद्द होणे, मराठा समाजास आरक्षण मिळण्यासाठी शासनाने राज्य मागास वर्ग आयोगाकडे सदरील विषय सोपविण्याची व पूर्ण सर्वेक्षण करुन योग्य अहवाल शासनास देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, आताचे राज्य मागासवर्ग आयोग बरखास्त करुन त्या ठिकाणी नवीन आयोग नेमण्याची निर्माण झालेली परिस्थिती, याबाबत शासनाने त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता, ओबीसी राजकीय आरक्षण संदर्भात इंपिरिकल डाटा संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्देश देणे, त्यानुसार समर्पित आयोग गठीत करण्याची अत्यंत आवश्यकता असणे, शासनस्तरावर याबाबत गंभीरपणे कार्यवाही न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**आठ : शासकीय विधेयके —**

**(क) पुर:स्थापनार्थ — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३ - डॉ. पी.ए. इनामदार विद्यापीठ, पुणे विधेयक, २०२२"

---

अप्रकाशित प्रत

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विधेयक विचारात घेणे.**

"सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक ११ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**(घ) विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १३ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक, २०२२"

---

**नऊ** : **सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, चंदुभाई पटेल, प्रविण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव –**

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे काम कासवगतीने सुरु असणे, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेच्या मेगा प्रोजेक्टमध्ये तसेच कोरोना उपाययोजना कामात उघडकीस आलेली भ्रष्टाचाराची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची प्रलंबित कामे, मुंबई महानगरपालिकेने सन २००५ ते २०२२ या १७ वर्षांच्या काळात रुपये ३ लाख ५२ हजार ९९० कोटी एवढी अवाढव्य रक्कम खर्च करुनही मुंबईच्या समस्या सोडवण्यात व मुंबईकरांना किमान सुविधा पुरवण्यात महानगरपालिकेला आलेले प्रचंड अपयश, मालमत्ता करात सूट देण्याबाबत मुंबईकरांची झालेली घोर फसवणूक, मुंबईतील मराठी शाळांत व पटसंख्येत कमालीची झालेली घसरण, मुंबई महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामे पाठीशी घातली जात असल्यामुळे अनधिकृत बांधकामांचे फुटलेले पेव, मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा दुसरा टप्पा २०१९ मध्ये सुरु होऊनही दोन वर्षात एक टक्काही काम झालेले नसणे, मुंबई महानगराची शान असलेल्या बेस्टचे खाजगीकरण करण्याचा घालण्यात आलेला घाट, मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामातील कोट्यवधींचे गैरव्यवहार निदर्शनास

अप्रकाशित प्रत

येऊन देखील चौकशी न करण्याच्या सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळे भ्रष्टाचाऱ्यांना मिळत असलेले प्रोत्साहन, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, ठाणे स्मार्ट सिटी प्रकल्पात झालेल्या अनियमिततेची तातडीने चौकशी पूर्ण करण्याची होत असलेली मागणी, तसेच महसूल विभागाच्या मुद्रांक शुल्क वसुलीत झालेला गैरव्यवहार निदर्शनास येऊन देखील दोषींवर कारवाई करण्यात होत असलेली दिरंगाई, आदिवासी समाजाच्या मालमत्ता विक्रीबाबत लावण्यात आलेले कठोर निर्बंध शिथिल करण्याची होत असलेली मागणी, महामार्गांसाठी लागणाऱ्या जमिनी भूसंपादन करताना झालेला भ्रष्टाचार, शासकीय जमिनी भाडेपट्टा व कब्जेहक्काने प्रदान केल्यानंतर दिलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी होत असलेला वापर, करारनाम्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याबाबतचे सॉफ्टवेअर कार्यरत असतानाही राज्यातील उपनिबंधक, नोंदणी कार्यालयांकडून आर्थिक फायद्यासाठी ऑनलाईन सेवेला दिलेला फाटा, क्षेत्रीय वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना शासनाने बदलीच्या कायद्याचा केलेला भंग, तसेच पर्यटन उद्योगावर अवलंबून असणाऱ्यांना टाळेबंदीत मदतीचा हात न दिल्यामुळे या क्षेत्राला बसलेला फटका, कोकण व राज्यातील पर्यटन विकासाकडे सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, महालक्ष्मी येथील रेसकोर्सवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क उभारण्याची घोषणा करुनही प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नसणे, अर्थसंकल्पात वरळी डेअरीच्या जागेवर पर्यटन केंद्र आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याची घोषणा करुनही अद्याप तांत्रिक बाबीही पूर्ण केल्या गेलेल्या नसणे, राज्यातील अनेक भागात प्रदूषणात झालेली वाढ, मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी रखडल्याने वाहनांमधून होणाऱ्या प्रदूषणाने गाठलेला उच्चांक, हवामान बदलाबाबत अभ्यासक्रम विकसित करण्याची घोषणा झाली असली तरी दोन वर्षात कोणतीही प्रगती झालेली नसणे, लोकप्रतिनिधी व स्थानिकांना विश्वासात न घेता डोंबिवली एमआयडीसीमधील १५६ कारखान्यांचे स्थलांतर करण्याचा एकतर्फी घेतलेला निर्णय, एकूणच नागरी व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे कोट्यवधी जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

दहा : **(मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ व बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.दिवाकर रावते,** डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री शशिकांत शिंदे, विलास पोतनीस, अमरनाथ राजूरकर, विक्रम काळे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री मोहनराव कदम, सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री अनिकेत तटकरे, रविंद्र फाटक, राजेश राठोड, अमोल मिटकरी, नरेंद्र दराडे, अभिजित वंजारी, संजय दौंड, विप्लव बाजोरिया, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अंबादास दानवे, दुष्यंत चतुर्वेदी, किशोर दराडे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मुंबईतील बऱ्याच इमारती ५० वर्षापेक्षा जास्त जुन्या झाल्यामुळे सदर इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील हवाईमार्गात (फनेल झोन) येणाऱ्या विमानतळाच्या परिसरातील इमारतींना उंचीची मर्यादा असणे, त्यामुळे या इमारतींचा विकास व पुनर्विकास आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असणे, मुंबई महापालिकेने सदर इमारतींचा नमूना गणनेच्या आधारे पुनर्विकास करण्यासाठी नगरविकास विभागाने योग्य निर्णय घेण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिका हद्दीत भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या व वर्षानुवर्षे प्रतिक्षेत असलेल्या इमारतींचा भोगवटा प्रमाणपत्रांबाबत "क्षमापित" निर्णय घेणे व मध्यम वर्गीय नागरीकांना दिलासा देणे, राज्यातील शहरांमधील एसआरए सक्षम प्राधिकाऱ्याने झोपडीधारकांची पात्रता ९० दिवसात प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था अन्य वेगवेगळ्या संस्थांना सन १९९६ पासून २०२१ पर्यंत २५ वर्षाचा कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटीसा देण्यात येणे, सदर नोटीसांमधील अकृषिक आकारणीचे प्रमाणदर अवाजवी असणे, सदर रक्कम भरण्यासाठी देण्यात आलेला अल्प कालावधी, सदर रक्कम न भरल्यास संबंधितांची बँक खाती/कार्यालये सील करणे, कोविड-१९ जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक/ व्यावसायिक अडचणीच्या काळात जात असतांना शासनाकडून या अकृषिक आकारणीमध्ये मदतीची अपेक्षा, पी.एम.जी.पी. प्रकल्पांतर्गत शासनाच्या, खाजगी जमिनीवरील व म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील सोसायट्यांना लावण्यात आलेला व्याजासहीत एन.ए.टॅक्स रद्द करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, म्हाडाच्या थकीत सेवा शुल्काबाबत उपाययोजना जाहीर करणे, तालुका तेथे म्हाडा प्रकल्पाची आवश्यकता, पुणे येथील जुन्या व जीर्ण झालेल्या म्हाडा इमारतींच्या पुनर्विकासाची आवश्यकता, राज्यभरातील जमिनीवरील म्हाडाचे असलेले आरक्षण व त्या जमिनींचा विकास व पुनर्विकास, म्हाडामार्फत नोकरदार महिलांसाठी वसतीगृह व मुलां-मुलींकरीता वसतीगृह बांधण्याबाबत कार्यवाही, पश्चिम उपनगरात आरक्षित भूखंडावर म्हाडामार्फत मोठ्या रुग्णालयांची उभारणी, मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथे म्हाडाच्या जागेवर पशुवैद्यकीय दवाखान्यांची उभारणी, शासकीय जमिनींवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या इमारतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचा पर्याय उपलब्ध करण्याबाबत, प्रलंबित असलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी ॲमनेस्टी स्किम त्वरीत अंमलात आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाच्या जागेवर असलेला झोपडपट्ट्यांचा प्रलंबित पुनर्विकास, एसआरए योजना संपूर्ण महाराष्ट्राला लागू करणे, धारावी झोपडपट्टी व बीडीडी चाळींचा पुनर्विकास करणे, याबाबत करावयाची निर्णयात्मक कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

अग्रिम प्रत

**अकरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु, पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक (१)] -**

(१) **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** सदाशिव खोत, महादेव जानकर, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

मौजे शेरेवाडी (आवळाई), (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील श्रीराम स्टोन क्रशर यांचेकडून अवैधरित्या दगड व मुरुमाचे उत्खनन होत असणे, उत्खननाकरीता पर्यावरण व प्रदूषण विभागाची तसेच, भूजल विज्ञान विभागाची परवानगी घेण्यात आली नसणे, सदर खाणपट्टा मंजूर करतांना नियम व अटींची पूर्तता करण्यात आली नसल्याने हा खाणपट्टा अनधिकृत असणे, खाणपट्ट्याच्या शेजारील पिण्याचा पाण्याच्या तलावामध्ये मोठया प्रमाणात उत्खनन केले असणे, त्यामुळे तलावाचे जलप्रदूषण होऊन पाण्याचा स्त्रोत संपण्याची शक्यता निर्माण झाली असणे, साधारणः ३ कि.मी. पर्यंत मोठ्या प्रमाणात धूळ वातावरणात पसरल्यामुळे २०० हेक्टर क्षेत्रातील शेतपिकांचे नुकसान झालेले असणे, तसेच परवाना व पासिंग नसलेली ट्रॅक्टर, जेसीबी व लोडिंगची वाहने इत्यादींच्या सहाय्याने अवैधरित्या उत्खनन केलेला दगड व मुरुम ट्रक व टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त भरणे, ओव्हरलोड गाड्यांमुळे रस्त्यावरील वाहतुकीला व नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत असणे, दगड व मुरुमाचे अवैधरित्या उत्खनन व प्रदूषण करणाऱ्या श्रीराम स्टोन क्रशर यांचेवर कारवाई करण्याबाबत शेरेवाडी ग्रामस्थांनी विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी तक्रार केली असणे, तक्रार करुनही दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, त्यामुळे सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया''

**(सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु, पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ( २ ते ४)] -**

(२) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रविण दटके, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्य वन्यजीव मंडळाच्या १६ व्या बैठकीत दहा पैकी आठ राखीव संवर्धन क्षेत्राची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली असणे, या नवीन संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्याच्या सूचना शासनाने दिलेल्या असणे, सदर राखीव क्षेत्रास अभयारण्याचा दर्जा

अमुद्रित प्रत

देण्याबाबत विभागीय स्तरावर समिती गठीत करण्यात आली असणे, समितीचे कार्य संथगतीने सुरु असल्याने माहे जानेवारी, २०२२ च्या अखेरीस झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत राखीव क्षेत्रास अभयारण्याचा दर्जा देण्यात आलेला नसणे, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या दृष्टीने योग्यता ठरविणे समितीचा उद्देश असणे, परंतू समितीच्या संथ कार्यवाहीमुळे दर्जा प्राप्त करण्यास अडचणी निर्माण होणे, त्यामुळे संवर्धन राखीव क्षेत्राला अभयारण्य घोषित करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईत म्हाडाच्या अनेक उपकर प्राप्त इमारती जुन्या व जीर्ण झाल्याने इमारती कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, याप्रकरणी शासनाकडे अनेकदा तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही होत नसणे, सदरहू इमारतींच्या दुरुस्तीकरिता महानगरपालिकेने रुपये ५०० कोटींची तरतूद करावी अशी मागणी सर्व स्तरावरुन होत असणे, विकास नियंत्रण नियमन (डीसीआर) मध्ये झालेल्या बदलामुळे विकासकांकडून पुनर्विकासामध्ये विलंब होत असणे, दक्षिण मुंबईतील इमारतीची दुरवस्था झाल्याने देखभाल, दुरुस्तीअभावी रहिवाशांना धोकादायक इमारतीत वास्तव्य करावे लागत असणे, सदरहू इमारतींच्या दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला असणे, याबाबत मुंबईतील मोडकळीस आलेल्या शेकडो उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रविण दटके, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"उपसंचालक आरोग्य विभाग, नागपूर अंतर्गत पदोन्नती पात्र ९७ आरोग्य कर्मचाऱ्यांची आरोग्य सहाय्यक पदावर तथा ४९ क्षेत्र कार्यकर्ता या पदावरून आरोग्य कर्मचारी पदावर पदोन्नतीकरिता कर्मचाऱ्यांनी दिनांक २८/१०/२०२१ रोजी आमरण उपोषण केले असणे, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी दोन दिवसात पदोन्नतीचे आदेश देण्यात येतील असे आश्वासन दिलेले असणे, दिनांक ०९/११/२०२१ रोजीच्या पत्रानुसार सर्व पात्र उमेदवारांच्या दस्ताऐवजाची पडताळणी पूर्ण झालेली असूनही पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले नसणे तसेच, जळगांव, पुणे, चंद्रपुर व नागपूर येथील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना “आरोग्य सहाय्यक” पदावर पदोन्नतीचे आदेश दिलेले असणे, त्यामुळे उपसंचालक, आरोग्य

विभाग, नागपूर येथील पात्रता यादीतील १४६ कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीचे आदेश न झाल्यामुळे आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, याबाबत कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी बॅलटद्वारे काढण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक (५ व ६) ] —**

**(५)** **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रविण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी सन २०२१-२०२२ करीता रुपये ४९०० कोटींची मागणी विदर्भ पाटबंधारे विभागाकडून जलसंपदा विभागाला करण्यात आलेली असणे, विदर्भात जवळपास २०० छोटे व मोठे प्रकल्प कार्यान्वित असून त्यातील ५० प्रकल्प नागपूर तसेच १५० प्रकल्प अमरावती विभागात येत असणे, मंजूर प्रकल्पांपैकी अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असणे, शेतकऱ्यांच्या शेतजमिनी प्रकल्पाकरिता संपादित होवूनही सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना होत नसणे, विदर्भातील अनेक प्रकल्प हे निधी मिळाला नसल्यामुळे प्रलंबित असणे, सन २०२१-२०२२ करीता आतापर्यंत रुपये २५०० कोटींची तरतूद उपलब्ध करून दिलेली असणे, मागणी केलेल्या निधीपेक्षा कमी निधी मिळाल्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना सिंचनाचा फायदा मिळण्याबाबत साशंकता निर्माण होणे, सन २०२२ व २०२३ या आर्थिक वर्षात विदर्भातील ५२८० सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर केलेला असणे, सिंचनाचा विदर्भातील अनुशेष पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६)** **डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, अमरनाथ राजूरकर, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"अनुदानित वसतीगृहातील कर्मचारी गत ३० ते ४० वर्षांपासून कार्यरत असणे, सदर कर्मचाऱ्यांना अल्प मानधनावर उदरनिर्वाह करणे शक्य होत नसल्याने त्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याची आवश्यकता असणे, अनुदानित वसतिगृह सेवाभावी संस्थेमार्फत चालविण्यात येणे, या संस्थांना शासनाकडून शंभर टक्के अनुदान मिळते परंतु सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या कालावधीमध्ये शासनाकडून विद्यार्थी परिपोषण अनुदान प्राप्त झालेले नसणे, शासनाच्या अधिपत्याखालील आश्रमशाळांना अनुदान प्राप्त होणे, त्यानुषंगाने अनुदानित वसतीगृहांना त्वरित अनुदान वितरित करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येणे, शासनाने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये निर्गमित केलेल्या परिपत्रकांनुसार राज्यातील वसतीगृहांचे

अप्रकाशित प्रत

अनुदान थांबविण्यात आले असणे, कोरोना प्रादुर्भावानंतर सर्व शैक्षणिक संस्था सुरू झाल्या असून विद्यार्थी वसतीगृहात राहण्यासाठी येत असणे, परंतु वसतिगृह चालक शासनाच्या परिपत्रकाची पूर्तता करू शकत नसल्याने राज्यातील एक लाख मागासवर्गीय गोरगरीब विद्यार्थ्यांचा राहण्याचा प्रश्न निर्माण झाला असून माहे डिसेंबर, २०१९ चे परिपत्रक रद्द करण्यात येऊन दिनांक १६ मार्च, १९९८ नुसार इमारत भाडे अदा करण्याची नितांत आवश्यकता असणे, वसतीगृहातील कर्मचारी यांचे मानधन वाढविणे, अनुदानित वसतीगृहांना अनुदान प्राप्त होणे तसेच अनुदानित वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ मार्च, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद